# वारकऱ्यांच्या वेशात सायबर वॉरियर्स - शारदा प्रांगणात प्रभावी सायबर दिंडी

## क्विक हील फाउंडेशनच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी सादर केला सायबर सजगतेचा अभिनव उपक्रम



बारामती-येथील विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर दिंडी या आगळ्यावेगळ्या जनजागृती उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने बारामती येथील शारदा प्रांगणात करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या वेशात सायबर सुरक्षेची माहिती देणारे फलक, पोस्टर्स आणि घोषवाक्यांसह पारंपरिक वारीच्या पद्धतीने प्रभातफेरी काढली. सायबर सजग, सुरक्षित वारी या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमात सादर करण्यात आलेले सायबर सजगतेचे कीर्तन हे खास आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांनी OTP फसवणूक, सोशल मीडिया फ्रॉड, पासवर्ड सुरक्षा आदी विषय भक्तिरसात प्रभावीपणे मांडले. नृत्य, घोषवाक्यांच्या गजरात प्रभातफेरी आणि माहितीपत्रकांचे वाटप

पान ६ वर